# अत्यंत महत्त्वाची सूचना

श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला, सोलापूर व नूतन विद्यालय, आष्टी यांच्या पदभरती प्रक्रियेमध्ये आपण विविध विषयांसाठी उमेदवार म्हणून 22 फेब्रुवारी 2026 रोजी लेखी परीक्षा दिलेली आहे. मात्र 22 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या परीक्षेमध्ये विज्ञान, गणित, इंग्रजी व संगीत या चार विषयांमध्ये मुलाखतीसाठी उमेदवार पात्र झालेले आहेत. डी. एल. एड., चित्रकला व बी.पी.एड. या विषयांसाठी एकही उमेदवार पात्र झालेला नाही. त्यामुळे या तीन विषयांसाठी पुन्हा नव्याने परीक्षा 15 मार्च 2026 रोजी घेण्यात आलेली आहे. संस्थेच्या परीक्षा आयोजन समितीने यापूर्वी प्रकाशित केलेल्या वेळापत्रकामध्ये 17 व 18 मार्च 2026 रोजी सर्व विषयांच्या मुलाखती घेण्याचे नियोजन केलेले होते. **मात्र तीन विषयांची पुनर्परीक्षा 15 मार्च 2026 रोजी घेतल्याने संस्थेच्या परीक्षा आयोजन समितीने सर्व विषयांच्या मुलाखतींचे नव्याने 23, 24 व 25 मार्च 2026 रोजीचे वेळापत्रक तयार केलेले आहे.** हे मुलाखतीचे वेळापत्रक या सूचनेसोबत सादर करत आहोत. तरी संस्थेच्या परीक्षा आयोजन समितीने जाहीर केलेल्या निकालामध्ये जे उमेदवार पात्र असतील अशा सर्व उमेदवारांनी नव्याने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार मुलाखतीसाठी उपस्थित राहावयाचे आहे. तसेच उमेदवारांनीही जुन्या वेळापत्रकात दिलेल्या मोबाईल नंबरवर संपर्क साधून माहिती प्राप्त करावी. अधिक माहितीसाठी वेळोवेळी **https://djgurukulsol.com** ही वेबसाईट / संकेतस्थळ पहावी.

## मुलाखतीचे वेळापत्रक

**मुलाखतीची वेळ:** दुपारी 04.00 वाजता

**मुलाखतीचे स्थळ :** वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी **(WIT)**, अशोक चौक, सोलापूर - 413006

| अनुक्रमांक | विषय | मुलाखतीचा दिनांक | मुलाखतीसाठी नाव नोंदणीची व हजेरीची वेळ |
|---|---|---|---|
| 01 | विज्ञान | सोमवार, 23 मार्च 2026 | दुपारी 03.30 वाजता |
| 02 | गणित | सोमवार, 23 मार्च 2026 | दुपारी 04.00 वाजता |
| 03 | इंग्रजी | मंगळवार, 24 मार्च 2026 | दुपारी 03.30 वाजता |
| 04 | संगीत | मंगळवार, 24 मार्च 2026 | दुपारी 04.00 वाजता |
| 05 | डी. एल. एड. | बुधवार, 25 मार्च 2026 | दुपारी 03.30 वाजता |
| 06 | चित्रकला | बुधवार, 25 मार्च 2026 | दुपारी 04.00 वाजता |
| 07 | बी.पी.एड. | बुधवार, 25 मार्च 2026 | दुपारी 04.30 वाजता |

**वरील वेळापत्रकानुसार सर्व पात्र उमेदवारांनी स्वखर्चाने मुलाखतीसाठी वेळेत हजर राहावयाचे आहे. जर एखादा उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकला नाही तर होणाऱ्या नुकसानेस उमेदवार स्वतः जबाबदार असेल. कृपया याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**Authorized Signatory**